**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

District Institute of Education And Training,
Near Dr. Babasaheb Ambedkar Statute, Panvel, Dist. Raigad
Pin-410 206. Tel. no.(022) 27468701

**महाराष्ट्र शासन**

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाजवळ,पनवेल,
जि.रायगड-४१० २०६ दूरध्वनी क्र. (०२२) २७४६८७०१

**E-Mail :-** dietraigad@maa.ac.in / diet.p13@gmail.com

**जा क्र. जिशिप्रसंप**/ शिक्षक, अधिकारी, व कर्मचारी स्पर्धा/**2025-26/ 903** **दि. २६/१० /२०२५**

प्रति,

१. मा. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व)
२. मा. जिल्हा क्रीडा अधिकारी (सर्व)
३. शिक्षणाधिकारी प्राथमिक, जि प (सर्व)
४. शिक्षणाधिकारी माध्यमिक, जि प (सर्व)
६. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती (सर्व)
७. प्रशासनाधिकारी, मनपा नपा, सर्व

विषयः- शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी, व कर्मचारी यांच्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करणेबाबत.

संदर्भः १. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचेकडील जा.क्र.राशैसंवप्रप/शिक्षक स्पर्धा/ २०२५-२६, दिनांक १०/१०/२०२५ चे पत्र

२. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचे दिनांक १४/१०/२०२५ रोजीच्या Online बैठकीमधील सूचना.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, राज्यातील राज्य मंडळाच्या अधिनस्त असणाऱ्या सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित, अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये शैक्षणिक, प्रशासकीय कौशल्य वृद्धिगत करणे, त्यांच्यात समन्वय, सहकार्य व स्पर्धात्मकतेची भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने तालुका, विभाग व राज्य स्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून करण्यात येत आहे.

राज्यातील सर्व शिक्षक व अधिकारी हे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सतत प्रयत्न करत असतात. गुणवत्तेचा ध्यास घेतलेले शिक्षक व अधिकारी हे अनेक पुस्तकांचे व नवनवीन योजनांचे वाचन करत असतात. वाचनातून ते प्रगल्भ बनतात. हेच प्रगल्भ विचार इतरांपर्यंत पोहोचवण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी देलेल्या निर्देशानुसार शिक्षक व अधिकाऱ्यांसाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पनवेल, रायगड वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करीत आहे.

**राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेची उद्दिष्टे** :

१. पूर्व प्राथमिक ते उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पर्यवेक्षीय अधिकारी व कर्मचारी यांना आपले विचार इतरांपर्यंत पोहोचवण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे.

२. पूर्व प्राथमिक ते उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पर्यवेक्षीय अधिकारी व कर्मचारी यांना सतत नाविन्याचा शोध घेणे, विश्लेषण करणे, सर्जनशील विचार करणे, शिक्षण क्षेत्रातील नवनवीन संकल्पना आत्मसात करणे, इत्यादी बाबींसाठी उत्तेजन देणे.

३. पूर्व प्राथमिक ते उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पर्यवेक्षीय अधिकारी व कर्मचारी यांच्यामध्ये प्रभावीपणे विचार मांडण्याची क्षमता विकसित करणे.

**राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेसाठी विषय :**

१. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020
२. पायाभूत साक्षरता व संख्या ज्ञानाची (FLN) गरज
३. शिक्षणाची ध्येय गाठण्यासाठी सद्यस्थितीतील अडथळे
४. शाश्वत विकासात शाळेची भूमिका
५. मातृभाषा आणि शिक्षण
६. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव व शिक्षण व्यवस्थेसमोरील आव्हाने
७. ऑनलाईन.... ऑफलाईन शिक्षण वास्तव व भविष्य
८. माझे सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासासाठीचे प्रयत्न

**वक्तृत्व स्पर्धेसाठी नियमावली :**

१. स्पर्धेसाठी वेळ : 07 मिनिटे.
२. वक्तृत्वदरम्यान आपल्या वक्तृत्वामुळे कोणताही सामाजिक वाद निर्माण होणार नाही याची खबरदारी स्पर्धकाने घ्यावी.
३. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील. त्याबाबत कोठेही आणि कोणत्याही प्रकारचे आक्षेप घेता येणार नाहीत.

**वक्तृत्व स्पर्धा मुल्यांकन तक्ता :**

| अ. क्र. | निकष | निकषाधारीत मुद्दे | गुण |
|---|---|---|---|
| १ | आशयाची मांडणी (Content/Subject Matter) | विषयाशी संबंधित माहिती, विचारांची सुसंगती, ठोस मुद्दे, ओजस्वी मांडणी, श्रोत्यांशी संवाद | ३० |
| २ | विचारांची स्पष्टता | विचारांची सुसंगती, ठोस मुद्दे, शुद्ध, प्रभावी, भावपूर्ण आणि योग्य शब्दप्रयोग | १५ |
| ३ | आवाज व उच्चार (Voice & Pronunciation) | स्पष्ट, ठळक, योग्य उच्चार, स्वरातील चढ-उतार आणि आवाजातील प्रभाव. | २० |
| ४ | आत्मविश्वास व देहबोली (Confidence & Body Language) | वक्त्याचा आत्मविश्वास, हालचाली, नजर संपर्क, उभे राहण्याची पद्धत | १५ |
| ५ | एकूण प्रभाव (Overall Impact) | वेळेचे नियोजन, वक्तृत्वाने श्रोत्यांवर निर्माण केलेला प्रभाव, आकर्षकता, प्रेरकता | २० |
| एकूण गुण | | | १०० |

**स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठीची प्रक्रिया**

१. स्पर्धेसाठी नाव नोंदणीसाठी मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी दिलेल्या लिंकवर केंद्रप्रमुख यांनी प्रत्येक स्पर्धेसाठी केंद्रातून एका शिक्षकाचे नाव स्पर्धेसाठी नोंदवावे.

२. प्रत्येक स्पर्धेत केंद्रातील किमान एका शिक्षकाने सहभाग घेणेबाबत प्रोत्साहित करण्यात यावे.

३. स्पर्धानिहाय सहभागी होणाऱ्या कर्मचाऱ्यांची/ शिक्षकांची लेखी संमती घ्यावी व स्पर्धेवेळी आयोजकांकडे सादर करावी.

**४. सर्व स्पर्धांसाठी तालुकास्तरावर सहभाग घेणाऱ्या शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांचे नामनिर्देशन गुगल फॉर्मद्वारे संकलित केले जाईल. केवळ केंद्रप्रमुख यांना लिंक पाठविली जाईल व केंद्रप्रमुख यांनी स्वतः शिक्षकांची क्षमता, कौशल्य पाहून नामनिर्देशन करावे. दि. २८ ऑक्टोबर २०२५ पर्यंत केंद्रप्रमुख यांनी शिक्षकांची माहिती भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.**

**५. सर्व स्पर्धा पुढील तीन स्तरावर आयोजित करण्यात येतील.**

   **a. तालुका स्तर २. विभाग स्तर ३. राज्यस्तर**

**६. वैयक्तिक तालुकास्तरावरील प्रत्येक स्पर्धेचा विजेता विभाग स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र राहील. विभाग स्तरावर प्रथम ५ क्रमांकाचे विजेते राज्य स्तरावर सहभागासाठी पात्र राहतील.**

७. या स्पर्धाची तयारी करण्यासाठी कोणत्याही प्रकारची सुट्टी घेता येणार नाही तसेच शिक्षकांच्या सहभागामुळे अध्ययन अध्यापनाचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

८. तालुकास्तरावर वरील स्पर्धांची जबाबदारी ही गटशिक्षणाधिकारी यांची राहील गटशिक्षणाधिकारी यांनी तालुका क्रीडा अधिकारी व तालुकास्तरीय समितीच्या मदतीने तालुकास्तरीय स्पर्धा विहित वेळेत पार पाडाव्यात.

९. तालुकास्तरीय स्पर्धेसाठी सक्षम परीक्षकांची नावे अंतिम करून DIET कडे बायोडाटासह दि. २८/१०/२०२६ पर्यंत पाठवावी. तसेच स्पर्धेचे ठिकाण ही कळवावे.

१०. प्रत्येक स्पर्धेसाठी तीन परीक्षकांची निवड करण्यात यावी परीक्षकांसाठी एससीईआरटी, पुणे कडून निधी प्राप्त झाल्यास स्पर्धेच्या दिवसासाठी निर्धारित मानधन देण्यात येईल.

११. प्रत्येक स्पर्धेचे ठिकाण हे आवश्यक सुविधा उपलब्ध असलेले असावे.

१२. स्पर्धेसाठी ५०% पुरुष व ५०% टक्के महिला असा सहभाग असावा, असे एसीईआरटी, पुणे कडील निर्देश आहेत. त्यानुसार आवड, क्षमता असणाऱ्या स्पर्धकांना संधी द्यावी. परंतु असे कि, जे स्वेच्छेने सहभागी होत आहेत अशा स्पर्धकांचा समावेश करावा. वरील नियम न पाळणाऱ्या स्पर्धकांचे नामनिर्देशन करू नये.

**वक्तृत्व स्पर्धेसाठी गट :**

राज्यातील राज्य मंडळाच्या अधिनस्त असणाऱ्या सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित, अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी या सर्वांसाठी एकाच गटामध्ये स्पर्धा घेण्यात येईल.

**तालुकास्तर कीडा स्पर्धा व अन्य स्पर्धा आयोजन समिती-**

| अ.क्र | सदस्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | गटशिक्षणाधिकारी | अध्यक्ष |
| २ | तालुका क्रीडा अधिकारी | उपाध्यक्ष |
| ३ | तालुका संपर्क अधिकारी (DIET) | सदस्य |
| ४ | तालुका आरोग्य अधिकारी | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ५ | तालुका माहिती अधिकारी | सदस्य |
| ६ | स्थानिक पोलीस अधिकारी | सदस्य |
| ७ | केंद्रप्रमुख पतीनिधी | सदस्य |
| ८ | विषय साधन व्यक्ती प्रतिनिधी | सदस्य |
| ९ | तालुका विस्तार अधिकारी (शिक्षण ) | सदस्य सचिव |

**विभाग स्तरीय व राज्य स्तरीय स्पर्धा आयोजनासाठी जिल्हा स्तर समिती –**

| अ.क्र | सदस्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | प्राचार्य, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था | अध्यक्ष |
| २ | जिल्हा क्रीडा अधिकारी | उपाध्यक्ष |
| ३ | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प., अलिबाग, रायगड | सदस्य |
| ४ | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प., अलिबाग, रायगड | सदस्य |
| ५ | जिल्हा आरोग्य अधिकारी प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | जिल्हा माहिती अधिकारी प्रतिनिधी | सदस्य |
| ७ | स्थानिक पोलीस स्टेशन प्रतिनिधी | सदस्य |
| ८ | गटशिक्षणाधिकारी प्रतिनिधी | सदस्य |
| ९ | प्रशासनाधिकारी प्रतिनिधी | सदस्य |
| १० | अधिव्याख्याता, DIET | सदस्य |
| ११ | वरिष्ठ अधिव्याख्याता, DIET | सदस्य सचिव |

तरी, सर्व केंद्रप्रमुखांनी मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी PDF स्वरूपात पाठविलेल्या पत्रामध्ये दिलेल्या लिंकवर CLICK करून स्पर्धेमध्ये सहभागी शिक्षकांची माहिती भरावी.

**सोबत : १. सर्व लिंक असणारी PDF.**

**२.** मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचेकडील जा.क्र.राशैसंवप्रप/शिक्षक स्पर्धा/ २०२५-२६, दिनांक १०/१०/२०२५ चे पत्र

३. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, अधिकारी, व कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका

(डॉ . रत्नप्रभा भालेराव)
प्राचार्य
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
पनवेल जि रायगड

प्रत : माहितीस्तव सविनय सादर

मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे .

प्रतः माहितीस्तव व कार्यवाहीस्तव

१. जिल्हा आरोग्य अधिकारी, सिव्हील हॉस्पिटल, अलिबाग, रायगड

२. जिल्हा माहिती अधिकारी, माहिती अधिकारी कार्यालय, अलिबाग

३. निरीक्षक, पोलीस स्टेशन, पोलीस निरीक्षक कार्यालय, रायगड